# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Manora**

**Date of Good Work done** :- **21/04/2023**

**Brief of the work done :-**

पोहरादेवी येथील चोरी प्रकरणातील आरोपी गजाआड ; 30 हजारांचा मुद्देमाल हस्तगत.

## पोहरादेवी येथील चोरी प्रकरणातील आरोपी गजाआड

### डीबी पथकाची कारवाई; चोरीतील मुद्देमाल जप्त

मानोरा, दि. २० (प्रतिनिधी)



पोहरादेवी येथील रामनवमी यात्रेत चोरी करणाऱ्या आरोपीस मानोरा डी. बी. पथकाने २० एप्रिल रोजी अटक केली आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहिती नुसार, तेलंगना राज्यातील नागार्जून जिल्ह्यांतर्गत येत असलेल्या पोषमगड्डा येथील रतलावत भिमला रातलावत नरय्या पोहरादेवी यात्रोत्सावा स आले होते. यावेळी भक्तीधाम येथे एका रूम मध्ये मुक्काम करुन दुसऱ्या दिवशी महंत बाबूसिंग महाराज यांचे दर्शन घेऊन ते २ एप्रिल रोजी आश्रमात जवळ असलेली बॅग उशा खाली ठेऊन झोपले होते. यावेळी चोरट्यानी लॅपटॉप,मोबाईल,चार्जर, कागद पत्रे असलेली बॅग लंपास केली. त्यामुळे रातलावत यांचे ३० हजार ७०० रुपयांचे नुकसान झाले. अशा तक्रारीवरुन पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल करुन प्रकरण तपासात घेतले. दरम्यान, सदर बॅग चोरी करणाऱ्या यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्यांतर्गत येत असलेल्या शहापूर येथील अजय उर्फ काळू विष्णू पवार या चोरट्याच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या. त्याच्या ताब्यातून चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस निरीक्षक महेश कुचेकर यांचे मार्गदर्शनाखाली डी.बी.पथक प्रमुख गणेश जाधव, मयुरेश तिवारी, बालाजी महल्ले, बंशी चव्हाण यांनी केली